**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक १९ ऑक्टोबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **विधानसभा निवडणुकीसाठी पात्र मतदारांना आज रात्री १२ वाजेपर्यंत नावनोंदणी करण्याची संधी.**
2. **राष्ट्रीय शिक्षण कर्मयोगी सप्ताहाचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं उद्घाटन.**
3. **भाजपच्या राष्ट्रीय सचिव विजया रहाटकर यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती.**
4. **शेतकऱ्यांच्या आत्महत्या, महिला अत्याचार आदी प्रश्नांवर महायुती सरकार अपयशी ठरल्यामुळे महिलांना पैसे वाटप करण्याची वेळ सरकारवर आल्याची समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव यांची टीका.**

--------------------------------

**नावनोंदणी**

**विधानसभा निवडणुकीसाठी ज्या पात्र मतदारांनी अद्याप नावनोंदणी केलेली नाही, ते आज रात्री १२ वाजेपर्यंत नोंदणी करू शकतात. ऑनलाईन मतदार नोंदणी करण्यासाठी** voters.eci.gov.in **या संकेतस्थळाला भेट द्यावी आणि अधिक माहितीसाठी टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक १९५० वर संपर्क साधावा. व्होटर हेल्पलाईन ॲपद्वारे मतदारांना आपलं नाव तपासता येईल आणि नवीन मतदार नोंदणीही करता येईल, असं जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयातून सांगण्यात आलं आहे.**

--------------------------------

**सी-व्हिजिल ॲप**

**विधानसभा निवडणुकीसाठीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून १५ ते १८ ऑक्टोबर या कालावधीत, राज्यभरात सी-व्हिजिल ॲपवर एकूण ४२० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी ४१४ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या. यामध्ये ठाणे जिल्ह्यातल्या सर्वात जास्त तक्रारींचं निवारण करण्यात आलं आहे. याकाळात राज्य शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज आणि मौल्यवान धातू आदी बाबतीत कोट्यावधी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.**

--------------------------------

**मतदार जागृती कार्यशाळा**

**विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी, आज वर्धा जिल्हयातील अनिकेत समाजकार्य महाविद्यालयामध्ये, जिल्हा स्वीप टीमच्या वतीने कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना मतदान प्रक्रियेविषयीची माहिती करून देण्यात आली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी आपल्या सर्व मित्रांना आणि नातेवाईकांना मतदान कारण्यासाठी प्रेरित करण्याचं आवाहन करण्यात आलं.**

**---------------------------------**

**कर्मयोगी सप्ताह**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते, आज राष्ट्रीय शिक्षण कर्मयोगी सप्ताहाचं नवी दिल्ली इथं उद्घाटन झालं. राष्ट्रीय शिक्षण सप्ताहात प्रत्येक कर्मयोगी किमान चार तास आपल्या क्षमतेशी निगडित काही नवीन शिकण्याचा कार्यक्रम पूर्ण करेल. `मिशन कर्मयोगी' या उपक्रमांतर्गत, २०२० पासून नागरी सेवा देणाऱ्यांसाठी क्षमता निर्मिती आणि मानव संसाधन व्यवस्थापनासाठी विकास साधण्याचा हा कार्यक्रम आहे. त्यासाठी** iGOT **कर्मयोगी सारखा डिजीटल मंच वापरला जाईल.** iGOT **कर्मयोगी या संकेत स्थळावर ,संस्थात्मक मूल्य, कार्यपद्धती, तंत्रज्ञानाची ओळख, सायबर सुरक्षा, आदी विषयांच्या कल्पक सादरीकरणातून अभ्यास करता येईल. विविध विषयांवरील अभ्यासक, चर्चा सत्रे आदी माध्यमांतून प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख बनवणं हा कर्मयोगी सप्ताहाचा उद्देश आहे.**

**---------------------------------**

**विजया रहाटकर**

**भाजपच्या राष्ट्रीय सचिव, राजस्थानच्या सह प्रभारी विजया रहाटकर यांची ,राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. विजया रहाटकर यांनी महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षा म्हणूनही आपला ठसा उमटविला होता. राष्ट्रीय महिला आयोगाचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या त्या पहिल्या मराठी व्यक्ती ठरल्या आहेत. या पदाला केंद्रीय राज्यमंत्री पदाचा दर्जा असेल. याआधी महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या उत्तम कामगिरीबद्दल त्यांना राष्ट्रीय कायदा पुरस्कार, तसेच अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचा सावित्रीबाई फुले पुरस्कार यांनी सन्मानित करण्यात आलं आहे. आपल्या वाढलेल्या जबाबदारीबद्दल आकाशवाणी नागपूरशी बोलतांना रहाटकर म्हणाल्या-**

***अत्यंत महत्त्वाचे हे पद आहे आणि याचं पालन जबाबदारीची जाणीव सुद्धा मला आहे, आणि मी अतिशय निष्ठेने हे काम पण करेन. शिक्षण आरोग्य सामाजिक स्थान अशा वेगवेगळ्या मुद्द्यांच्या आधारे महिलांच्या क्षमतांना आणि संधींना अधिक गती***

*देण्याचा मी प्रयत्न करेल, महिलांची सुरक्षा हा महत्त्वाचा विषय आहे, सन्मान ही हा महत्त्वाचा विषय आहे. परंतु, महिलांच्या क्षमतांना गती देणं सुद्धा तितकाच महत्त्वाचा आहे, आणि विकसित भारत जर बघायचा असेल, सर्व दृष्टीने परिपूर्ण बघायचा असेल, तर महिलांना सुद्धा सगळ्या क्षेत्रामध्ये उत्तम अशी संधी दिली पाहिजे, असं मला वाटतं आणि म्हणून महिलांच्या नेतृत्वाखाली विकास यात्रेला चालना देण्याचा माझा प्रयत्न असेल.*

--------------------------------

**अखिलेश यादव सभा**

**महाराष्ट्रातील महायुती सरकारने राज्यातील जनतेला महादुःखी केलं असून, भाजपच्या सत्तेत देशात भुकबळी वाढले आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या असून महिलांवर अत्याचार होत आहेत. या सर्व प्रश्नांवर हे सरकार अपयशी ठरल्याने आता महिलांना पैसे वाटप करण्याची वेळ सरकारवर आली आहे, अशी टीका धुळ्यातील जाहीर सभेत समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार अखिलेश यादव यांनी केली. धुळे शहर विधानसभा मतदारसंघात समाजवादी पार्टीचे उमेदवार इर्शाद जहागिरदार यांच्या प्रचारासाठी राज्यातील पहिली प्रचार सभा अखिलेश यादव यांनी आज धुळ्यात घेतली. महाराष्ट्राची ही ऐतिहासिक निवडणूक ठरणार आहे. राज्यातील महायुतीचे सरकार हटवण्यासाठी मतदान करण्याचं आवाहन यादव यांनी जाहीर सभेत केलं.**

--------------------------------

**ॲड.प्रकाश आंबेडकर**

**फोडा आणि राज्य करा, हेच भाजप आणि काँग्रेसचे धोरण आहे. हरियाणा आणि महाराष्ट्रात भाजपने सर्वोच्च न्यायालयाचा क्रीमीलेअर आणि अनुसूचित जातींमधील वर्गीकरणाचा चुकीचा निर्णय लागू केला असल्याचं, वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी ट्विटद्वारे म्हटलं आहे. भाजप आणि काँग्रेस या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून ,अनुसूचित जाती जमातींनी आपल्या अधिकार आणि स्वातंत्र्याचं रक्षण करण्यास वचनबद्ध असणाऱ्या स्वतंत्र आंबेडकरी नेतृत्वाची निवड करण्याचं आवाहन केलं आहे.**

--------------------------------

**काँग्रेस बैठक**

**विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, काँग्रेसच्या वरिष्ठ निरिक्षकांच्या बैठकीला मुंबईतील टिळक भवन इथं सुरुवात झाली आहे. या बैठकीला महाराष्ट्राचे प्रभारी, रमेश चेन्नीथला, राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गहेलोत, छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल, पंजाबचे माजी मुख्यमंत्री चरणजित सिंग चन्नी, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, कर्नाटकचे मंत्री जी. परमेश्वरा, एम. बी. पाटील,**

तेलंगाणाचे मंत्री उत्तम कुमार रेड्डी, दरासरी अनुसया सिताक्का, टि. एच. सिंग देव, खासदार नासीर हुसेन यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित आहेत.

--------------------------------

नक्षल-आत्मसमर्पण

महाराष्ट्रासह ओडिशात नक्षल चळवळीत काम करणाऱ्या दाम्पत्याने गडचिरोली पोलिसांपुढे आज आत्मसमर्पण केले. त्यांच्यावर आठ लाखांचे बक्षीस होते.असिन राजाराम कुमार ऊर्फ अनिल ऊर्फ गगनदीप ऊर्फ निशांत ऊर्फ सुशांत आणि अंजू सुळ्या जाळे उर्फ सोनिया उर्फ जनिता, रा.गुरेकसा ता.धानोरा जि.गडचिरोली असं या दाम्पत्याचं नाव आहे. असिन हा ओडिशातील नक्षल चळवळीच्या प्रेस टीममध्ये एरिया कमिटी मेंबर म्हणून काम करायचा तर अंजू ही याच दलममध्ये सदस्य होती. २०१८ पासून ते हिमाचल प्रदेशातील सुन्नी इथं राहून नक्षल चळवळीसाठी काम करत होते.

--------------------------------

55व्या इफ्फीसाठी नोंदणी

55व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात इफ्फीसाठी मीडिया प्रतिनिधींच्या नोंदणीला आज सुरुवात झाली आहे. दिनांक 20 ते 28 नोव्हेंबर दरम्यान गोव्यातील पणजी इथं आयोजित 55 व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात माध्यम प्रतिनिधी म्हणून नोंदणी करण्यासाठी, 1 जानेवारी 2024 पर्यंत वयाची 21 वर्षे पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे. मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल किंवा ऑनलाइन माध्यम संस्थेशी संबंधित वार्ताहर, छायाचित्रकार, कॅमेरा पर्सन किंवा डिजिटल सर्जक my.iffigoa.org/media-login या संकेतस्थाळावर नोंदणी करू शकतात.

'आढावा विधानसभा मतदारसंघांचा'

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम, दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज नाशिक जिल्ह्यातल्या ७ मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

--------------------------------

मराठवाडा कृषी विद्यापीठ

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या. पाच पिकांच्या वाणाचा समावेश, भारताच्या राजपत्रात करण्यात आला आहे. याबाबत केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. यात परभणी चणा-१६, सोयाबीनच्या एमएयूएस ७३१, देशी कापसाच्या पीए ८३३, अमेरिकन कापसाच्या एनएच ६७७ आणि तिळाच्या टीएलटी १० या वाणांचा समावेश आहे.

---------------------------------

**बाबा सिद्दीकी**

**बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात, पोलिसांनी आतापर्यंत ९ जणांना अटक केली आहे. याप्रकरणी पोलिसांनी बाबा सिद्दीकी यांच्या सुरक्षारक्षकाला निलंबित केलं आहे. सुरक्षेसाठी तैनात असतांनाही त्याने कर्तव्यात कसूर केल्याबद्दल कॉन्सटेबल शाम सोनवणे याला निलंबित करण्यात आलं आहे. हल्लेखोरांनी मिरची पावडरच्या स्प्रेचा आणि धुराचा वापर केल्यामुळे गोळीबार करता न आल्याचं , कॉन्सटेबलने आपल्या जबानीत म्हटलं आहे.**

---------------------------------